www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

वर्ष -१८, अंक-४० छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. २३ जून २०२५ किंमत २ रूपये, पाने -४

# रात्री खून, सकाळी बुलडोझर; व्यापाऱ्यांचे निदर्शने, आरोपींना १० तासात जामीन

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

मुकुंदवाडी परिसरात २२९ अतिक्रमणे काढल्यानंतर स्थानिक व्यापारी आक्रमक झाले आहेत. यासाठी केवळ मोदी सरकार जबाबदार आहे. काल जो खून झाला त्याचा आणि आमचा काहीही संबंध नव्हता. तरीसुद्धा आम्हाला शिक्षा का देण्यात आली असा सवाल व्यावसायिकांनी उपस्थित केला आहे.

दरम्यान एक महिला व्यावसायिक म्हणाल्या की, या परिसरात परवा जो खून झाला यात आमची काही चुकी होती का नाही ना? आम्ही टॅक्स भरतो ना मग तो का घेतला आमच्याकडून असा सवाल केला आहे.

दुसऱ्या महिला व्यावसायिक म्हणाल्या की, आमची मनपा आयुक्तांनी आमच्या पोटावर पाय दिली आहे. आम च्या राहते घर पाडले त्यासाठी आम्हाला नोटीस देखील देण्यात आली नाही. खून झाल्याचा आम्हा सर्वांना राग आहे पण आयुक्तांना जर त्याचा इतका राग आला असेल तर आरोपींना ९ तासात जामीन मिळतो कसा? त्यांनी आरोपीना भरचौकात आणत शिक्षा द्यावी पण आमच्या पोटावर पाय देऊ नये.

संजयनगरात रस्त्यालगत खिन्न मनाने दोन सुना आणि चार नातवंडे घेऊन बसलेल्या सुशीलाबाईचे डोळे पाण्याने डबडबले होते. 'मी गेल्या ४० वर्षांपासून या ठिकाणी राहते आहे. आता दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे. सगळे जण आम्ही १० बाय २० च्या जागेत जीवन जगत होतो. पती कंपनीत काम करतात, तेथून घरी येऊन खिडक्यांच्या काचांचा व्यवसाय करत होते. पै-पै जोडून उभे केलेले सर्वकाही एका क्षणात मनपाने काढून टाकले. मी एका दवाखान्यात काम करते. रात्रपाळी करून आले होते. दुपारी जेवणाच्या ताटावरच बसले होते, तितक्यात १०० लोकांचा फौजफाटा आला अन् सगळं काही उद्धवस्त करून गेला? या धक्क्यातून वर येणे अशक्य आहे,' असे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले.









मस्तान ऊर्फ नन्ना, समीर खान, बाबर शेख, साजीद कुरेशी, नासीर खान

## पोलिसांचा निष्काळजीपणा; खुनातील आरोपींना १० तासात जामीन

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

लघुशंकेच्या कारणावरून किरकोळ वाद होताच मटन काप्याच्या सतूनेवार करून मुकुंदवाडीत नितीन संकपाळ या तरुणाचा खून करण्यात आला, तर दोघे गंभीर जखमी झाले. या प्रकरणात पोलिसांनी रात्रीतून पाच आरोपींना बेड्या ठोकल्या खऱ्या मात्र आरोपींना अटकेची कारणे लेखी स्वरूपात दिलीच नाहीत. त्यामुळे न्यायालयात हजर करण्यात आलेल्या पाचही आरोपींना अवघ्या १० तासांत जामीन मिळाला. दरम्यान, यापाचही आरोपींना साताऱ्यातील दरोड्याच्या गुन्ह्यात अटक करून पुन्हा न्यायालयात हजर केले जाईल अशी माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी यांनी दिली.

दत्ता बालाजी जाधव (२६, रा. राजनगर, हा खुनाच्या गुन्ह्यात फिर्यादि आहे. त्यानुसार, फिर्यादी व त्याचे मित्र नितीन व सचिन संकपाळ आणि त्यांच्यासोबत असलेला राजीकचा दाजी, असे चौघेजण सायंकाळी रायगड हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते. जेवणानंतर दत्ता जाधव हा लघुशंकेसाठी बाजूला गेल्यावर नितीन व सचिन हे हॉटेलबाहेर गप्पा मारत असताना अचानक ५ते ६ इसमांनी त्यांच्यावर कोयते व चॉपरने हल्ला चढवला. दुताने मधे पडण्याचा प्रयत्न केला असता त्यालाही जबर मारहाण करण्यात आली, या हल्लवात नितीनचा मृत्यू झाला. तर दत्ता जाधव आणि सचिन संकपाळ गंभीर जखमी झाले. प्रकरणात एमआयडीसी सिडको पोलिस ठाण्यात गुन्दा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस आयुक्त सुदर्शन पाटील करीत आहेत. आरोपींना शुक्रवारी (दि. २) सकाळी ६ वाजता अटक करून दुपारी ४ वाजता न्यायालयात हजर करण्यात आले.

आरोपीच्या अटकेची कारणे लेखी स्वरुपात दिलेली नाहीत. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या नर्णयांचा दाखला देत आरोपींची अटक ही घटनाबाह्य असल्याचे आरोपींचे वकील ॲड. अजहर हुसेन पटेल यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत न्यायालयाने तपास अधिकारी एसीपी सुदर्शन पाटील यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी अटकेची कारणे आरोपींना लेखी स्वरूपात दिली गेली नसल्याचे मान्य केले. त्यानंतर न्यायालयाने भारतीय संविधानातील अनुच्छेद २२(१) आणि बीएनएसएसच्या कलम ४७ चे उल्लंघन झाल्याचा निष्कर्ष नोंदवत विशेष न्यायाधीश ए.आर. उबाळेयांनी पाचही आरोपींना प्रत्येकी २५ हजारांच्या जात मचलक्यावर जामीन मंजूर केला.

# उद्योगस्नेही वातावरणातून छत्रपती संभाजीनगर महानगरासह मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळेल - विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर

## ऑरिक सिटी येथे शेंद्रा-बीडकीन उद्योग वसाहतीत येणाऱ्या उद्योगांच्या अडचणीबाबत आढावा

छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)

राज्यात अधिकाधिक गुंतवणूक यावी यासाठी उद्योगांना सर्व ते सहकार्य करण्याचे शासनाचे धोरण आहे. उद्योगांच्या समस्या सोडविण्यासाठी विविध प्रशासकीय विभागांनी समन्वय ठेऊन एकत्रित प्रयत्न करावेत, उद्योगस्नेही वातावरणातून छत्रपती संभाजीनगर महानगरासह मराठवाड्याच्या विकासाला चालना मिळेल,यासाठी सर्व मिळून मिशन मोडवर काम करूया, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले.

ऑरिक सिटी येथे शेंद्रा-बीडकीन उद्योग वसाहतीत येणाऱ्या उद्योगांच्या अडचणीबाबत विभागीय आयुक्त श्री पापळकर यांनी आज उद्योजकांशी



संवाद साधत आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, डीएम आयसी सह व्यवस्थापकीय संचालक दत्ता भडकवाड, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी श्री. भामरे, औद्योगिक विकास एमआयडीसीचे प्रकल्प व्यवस्थापक अरुण दुबे, व्यवस्थापक महेश पाटील, उपविभागीय प्रांत अधिकारी व्यंकट राठोड, पैठणच्या उपविभागीय प्रांत अधिकारी निलम बाफना यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री पावळकर म्हणाले, मराठवाड्यात अधिकाधिक गुंतवणूक वाढावी, यादृष्टीने उद्योगांना आवश्यक ते सहकार्य तसेच सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणांनी पुढाकार घ्यावा, उद्योजकांच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने उद्योजक व प्रशासन यामध्ये संवाद महत्त्वाचा आहे. उद्योगांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने संवाद साधण्यात येईल. बैठकीत उद्योजकांनी मांडलेल्या अडचणींवर संबंधित विभागांनी विहित कालमर्यादेत कार्यवाही करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर ते पुणे रस्त्यांवरील वाहतूक सुलभ व्हावी, यादृष्टीने नियोजन करावे, तसेच वाहतुकीच्या अनुषंगाने तात्काळ करण्यासारख्या उपाययोजना हाती घेऊन उद्योगांना वाहतूक कोंडीपासून दिलासा द्यावा, विभागात उद्योग उभारणी, त्यांच्या पायाभूत सुविधांच्या अडचणी, याबाबत सातत्याने उद्योगांशी संवाद साधण्यासाठी प्रशासन कायम उपलब्ध आहे, असेही विभागीय आयुक्त श्री. पापळकर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शेंद्रा-बीडकीन येथील उद्योजकांच्या प्रशासकीय प्रलंबित विषयाबाबत दोन दिवसीय शिबिर घेत त्या सोडविण्यात येतील. छत्रपती संभाजीनगर उद्योग क्षेत्रात अग्रेसर असून उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासोबतच उद्योग वाढीसाठी प्रशासन उद्योजकांसोबत आहे, असे ते म्हणाले. यावेळी मासिआ या उद्योजक संघटनेचे प्रतिनिधीही आपल्या अडचणी मांडल्या. उद्योजकांनी मांडलेल्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आपल्या सोबत आहे, उद्योगांच्या वाढीला चालना देण्यात मासिआची भूमिकाही महत्त्वाची असेल, असेही विभागीय आयुक्त श्री. पापळकर म्हणाले. ऑरिक सिटी येथील नियंत्रण कक्षाची विभागीय आयुक्तांनी पाहणी करून समाधान व्यक्त केले. व्यवस्थापक महेश पाटील यांनी या कक्षाबाबत माहिती दिली. यावेळी विविध विभागाचे प्रमुख अधिकारी, उद्योजक तसेच उद्योजक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## संपादकीय

# जागतिक योग दिन आणि निरोगी जीवनशैली

भारताची मूळ संस्कृती योग आहे. ही योग संस्कृती लोप पावत गेली. या योग संस्कृतीला पुनः जीवित करण्यासाठी भारताचे पंतप्रधान, नरेंद्र मोदी यांनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेच्या ६९ व्या सत्राला संबोधित करताना वर्षामधील एक दिवस हा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' साजरा करण्याचे आवाहन केले व दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेच्या १९३ सदस्यांपैकी १७७ सदस्य देशांनी २१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' आयोजित करण्याच्या ठरावाला मान्यता दिली. तसेच प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवसाची थीम ठरविलेली असते. या वर्षी १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन आपण साजरा करत आहोत. या वर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवसाची 'एक पृथ्वी आणि एक आरोग्यासाठी योग' ही थीम ठरविलेली आहे. जागतिक आरोग्यासाठी आणि पर्यावर्षीय सुसंवादासाठी योगाच्या योगदानावर भर देते. म्हणजेच योगाद्वारे संपूर्ण जग निरोगी बनविण्याची इच्छा 'एक पृथ्वी आणि एक आरोग्यासाठी योग' या थीमद्वारे स्पष्ट दिसून येते.

योग ही प्राचीन भारतीय विद्या, संस्कृती आहे. ही संस्कृती वेद, उपनिषद, रामायण व महाभारत इतकेच नाही, तर भारतातील समस्त अध्यात्मिक पवित्र ग्रंथांमध्ये याचा समावेश आहे. साक्षात देवांनाही योग सुटला नाही. योगाचे आदिगुरू, प्रथमगुरू 'शिव'. शिवाने पार्वतीला योग सांगितला, अशी आख्यायिका आहे, पण आदिगुरू शिव आहे. आदिगुरूंनी ही योगविद्या सप्तऋषींना दिली. या सप्तऋषींनी या योगविद्येचा प्रसार आशिया खंडात, तसेच जगातील अनेक भागांत केला. पुढे वैदिक काळात महामुनी पतंजलींनी योग या विषयाला योगसुत्रात सूत्रबद्ध केले. योग या शब्दाची उत्पती कशी झाली? योग म्हणजे नक्की काय? योग या शब्दाची उत्पती प्राचीन काळी झाली. योग हा शब्द संस्कृत युज या धातूपासून तयार झालेला आहे. योग म्हणजे जोडणे, एकत्र आणणे, काय एकत्र आणणे, तर शरीर आणि मन यांना एकत्र आणणे, दुःखाला सुखासोबत जोडणे, आत्म्याला परम्यात्मासोबत जोडणे. आत्मा हा स्वयंप्रकाशित आहे. आत्म्याचा हा ईश्वरीप्रकाश अनुभव करावयाचा असेल, तर योगाची साधना करणे आवश्यक आहे. योग साधनेत वयाला बंधन नाही. योग काय करतो? तर शरीर आणि मन जोडण्याचे काम करतो. योगशास्त्रात शरीर, मन आणि आत्मा या तीन संकल्पनांना महत्त्व आहे. योगशास्त्र हे मनाभोवती फिरणारे शास्त्र आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात आपण कोठे आहोत? हे एकदा डोकावून बघा. वरील मुद्यांचा विचार करा. बघा काही उत्तर मिळते का? नाही ना! जेव्हा आपल्याला म्हणजेच शरीराला, मनाला काही वेदना, व्याधी निर्माण झाली की आपण काय करतो? आपण डॉक्टरांकडे जातो. डॉक्टरांनी दिलेले औषधी आपण घेतो आणि आपल्याला बरे वाटते. बरं शरीराला व्याधी झाली, तर औषधी आणि मनाला व्याधी झाली तर काय? यासाठी योग व योगासने, प्राणायाम आणि ध्यान करणे आवश्यक आहे. आजचे धावपळीचे आयुष्य पाहता, अनेक ताणतणाव यास आपल्याला सामोरे जावे लागते. मनावर ताण निर्माण झाला की मधुमेह, उच्च रक्तदाब, थायरॉईड यासारखे विकार उद्भवतात आणि शरीरावर ताण निर्माण झाला की कंबरदुखी, पाठदुखी, मानदुखीचा त्रास आपल्याला होतो. वास्तविक पाहता, ९५ टक्के आजार हे सायकोसोम्याटीक आहेत. उरलेले ५ टक्के हे आजार हे शारिरीक आहेत.

प्राचीन काळी योग करणे हे सभ्यतेचे लक्षण मानले जाई, का तर गुरू गोरक्षनाथ, मच्छेंद्रनाथ, या नाथ सांप्रदायांनी योग आचरण करून अनेक विकारांना दूर ठेवले. स्वतः व समाजातील लोकांना योग जीवनशैली कशी अंगीकारायची हे शिकवले. पुढे संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम या संतांनी भक्तीयोगातून योगसाधना केली व ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली. तसेच पतंजली महामुनींनी सर्वसामान्य व्यक्तीला समजेल असा अष्टांगयोग सांगितला. हा अष्टांगयोग यम, नियम, आसन, प्राणायाम, धारणा, ध्यान, समाधी होय. आजच्या धावपळीच्या जीवनात आपल्याला योग समजून घ्यायचा असेल, शिकायचा असेल तर पतंजलींचा योग अभ्यासावा. हा योग अभ्यास सहज सोपा आहे. आजचा महिलावर्ग हा घरात आणि घराबाहेर धावपळ करून काम करत असतो. हे काम करत असताना महिला वर्गाची होणारी चीडचीड, द्वेष, राग आणि याच्यातून उत्पन्न होणारे आजार, जसे वजन नियंत्रणात न राहणे, निद्रानाश, थायरॉईड, पीसीओडी, लोहाची कमतरता, मोनोपॉज या गोष्टी कळत –नकळत यातून महिला वर्गाचा प्रवास होत राहतो. औषधोपचार करून या आजारांना काही काळ दाबलं जात. कालांतराने परत हे आजार उफाळून वर येतात. या विकारांना मग ते शारिरीक असो किंवा मानसिक असो, त्या विकारांना नष्ट करायचे आहे. निरोगी जीवनशैली जगायची आहे. त्यासाठी पतंजली मुनींचा अष्टांगयोग समजून घेऊन योगसाधना सुरू करू या. समाजातील जे संघर्ष चालू आहेत ते पतंजलींनी सांगितलेल्या अष्टांग योगातील 'यम' या अंगाच आचरण करून आपण टाळूया. योगाचा अभ्यास सुरू करून निरोगी जीवन जगण्याचा संकल्प करू या.

# विधवा भगिनींना उजळमाथ्यांनी जगू द्या!

**(२३ –२५ जून: आंतरराष्ट्रीय विधवा दिवस विशेष.)**

आज सशस्त्र संघर्ष, विस्थापन आणि स्थलांतर आणि कोविड–१९ साथीच्या आजारामुळे हजारो स्त्रिया नव्याने विधवा झाल्या आहेत आणि इतर अनेक ज्यांचे जीवनसाथी हरवले आहेत किंवा गायब झाले आहेत. विधवांचे अनोखे अनुभव आणि गरजा समोर आणल्या पाहिजेत, त्यांच्यासोबत मार्ग दाखवणारे आवाज बुलंद केले पाहिजेत. भारतात स्त्रियांना पुरुषाच्या बरोबरीने समान दर्जा देण्यासाठी अनेक संघटना आणि समाजसुधारक कार्य करत आहेत. मात्र भारतातील विधवांच्या प्रश्नाकडे डोळेझाक करण्यात येत असल्याचा आरोप होत राहतो.

विधवांना त्यांचे हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने २३ जून हा दिन आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तेव्हा जाणून घेऊया काय आहे विधवा दिनाचा इतिहास, महत्व आणि उद्देश याबाबतची माहिती. काय आहे विधवा दिनाचा इतिहास? कोणत्याही स्त्रिला आपल्या जोडीदार निवडण्याचा अधिकार आहे. मात्र काही कारणास्तव त्यांचा जोडीदार गमावल्याने अशा महिलांना एकाकी आयुष्य जगावे लागते. त्यामुळे विधवा महिलांचे प्रश्न मोठे भयंकर आहेत. विधवा महिलांचा प्रश्न फक्त भारतातच नाही, तर जगभरात गंभीर होत चालला आहे. त्यासाठी गेल्या सात वर्षापासून यूकेची लूम्बा फाउंडेशन ही संस्था जगभरातील विधवा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात संयुक्त राष्ट्रांमध्ये मोहीम राबवत आहे. विधवांचे प्रश्न बिकट झाल्याने संयुक्त राष्ट्र संघाने २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

काय आहे विधवा दिन साजरा करण्याचा उद्देश? जागतिक पातळीवर विधवा महिलांचे प्रश्न भयंकर असल्याने संयुक्त राष्ट्राने २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिन साजरा करण्याचे जाहीर केले. त्यानुसार दरवर्षी विधवा दिनाचे औचित्य साधून या दिवशी विधवा महिलांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतात. जगभरातील विधवा महिलांची स्थिती सुधारावी, त्यांना इतर महिलांसारखे सामान्य जीवन जगता यावे यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न करण्यात येतात. इतर सामान्य महिलांसारखे त्यांना समान हक्क मिळण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघ प्रयत्न करते. मात्र आपण कितीही प्रगत झालो, तरी विधवा महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टीकोन बदलत नाही. जागतिकीकृत पातळीवर विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. पती नसल्याने कुटूंब त्यांच्याकडे विशेष लक्ष देत नाही. तर कधी विधवा महिलांना वाऱ्यावर सोडले जाते. यामुळे जगभरातील लाखो विधवा महिला गरिबी, हिंसाचार, बहिष्कार, बेघरपणा, आजारी आणि समाजातील भेदभाव सहन करतात. विधवाविवाहास आपण सर्वपरीने प्रोत्साहन आणि आटोकाट प्रयत्न केले पाहिजे. जगभरातील ११५ दशलक्ष विधवांना गरिबीत जगण्यास भाग पाडले जाते. तर ८१ दशलक्ष महिलांना शारीरिक शोषणाचा सामना करावा लागत असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे. जागतिक पातळीवर विधवा महिलांच्या न्याय हक्काचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यात भारतातही विधवा महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. भारतात चार कोटींहून अधिक विधवा महिला आहेत. आजही विधवा महिला त्यांच्या हक्कापासून वंचित आहेत. या विधवा महिलांना पती नसल्याने मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते. एक उदाहरण आहे– जोवेरिया नाबुकेन्या एक विधवा, इसिंगिरो जिल्ह्यात तिच्या काही ८ नातवंडांसोबत वाचते. युनिसेफच्या पाठिंब्याने नाबुकेन्या मुख्य कौटुंबिक काळजी प्रॅक्टिसेसवर आहेत. तिची एक दिनचर्या आहे जिथे ती मुलांसोबत वाचते आणि ते शिकत असताना त्यांच्यासोबत खेळते.



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
संत व लोक साहित्याचे गाढे अभ्यासक

जगभरातील बऱ्याच महिलांसाठी, त्यांच्या मूलभूत हक्कांसाठी आणि प्रतिष्ठेसाठी दीर्घकालीन लढ्याने जोडीदाराचा विनाशकारी तोटा वाढविला जातो. जगभरात २५८ दशलक्षाहून अधिक विधवा असूनही, विधवांना ऐतिहासिकदृष्ट्या आपल्या समाजात न पाहिलेले, समर्थन न मिळालेले आणि मोजले गेलेले नाही. भूतकाळातील अनुभव दर्शवितो, की विधवांना अनेकदा वारसा हक्क नाकारले जातात, जोडीदाराच्या मृत्यूनंतर त्यांची मालमत्ता बळकावली जाते आणि रोगाचे 'वाहक' म्हणून त्यांना अत्यंत कलंक आणि भेदभावाचा सामना करावा लागतो. जगभरात, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे, म्हणून जोडीदाराच्या मृत्यूमुळे वृद्ध स्त्रियांना निराधारपणा येऊ शकतो. लॉकडाऊन आणि आर्थिक बंदच्या संदर्भात विधवांना ते खूप आजारी पडल्यास किंवा स्वतःला आणि त्यांच्या मुलांचे पालनपोषण करण्यासाठी त्यांना बँक खाती आणि पेन्शन मिळू शकत नाहीत. एकटी–माता कुटुंबे आणि अविवाहित वृद्ध स्त्रिया आधीच विशेषतः गरिबीसाठी असुरक्षित आहेत, हे एक क्षेत्र आहे ज्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनी जगभरातील विधवांवर परिणाम करणाऱ्या काही समस्या आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण आणि प्रगती करण्यासाठी काय केले पाहिजे यावर एक नजर टाका. युनायटेड नेशन्स सन २०११पासून २३ जून हा आंतरराष्ट्रीय विधवा दिवस म्हणून पाळत आहे, विधवांच्या आवाजाकडे आणि त्यांच्या अनुभवांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि त्यांना आवश्यक असलेला अनोखा पाठिंबा मिळवण्यासाठी पाळला पाहिजे. आता पूर्वीपेक्षा अधिक हा दिवस विधवांना पूर्ण हक्क आणि मान्यता प्राप्त करण्याच्या दिशेने कृती करण्याची संधी आहे. यामध्ये त्यांना त्यांचा वारसा, जमीन आणि उत्पादक संसाधनांचा वाजवी वाटा मिळण्याची माहिती प्रदान करणे समाविष्ट आहे; निवृत्तीवेतन आणि सामाजिक संरक्षण जे केवळ वैवाहिक स्थितीवर आधारित नाही; सभ्य काम आणि समान वेतन; आणि शिक्षण आणि प्रशिक्षण संधी. विधवांना स्वतःला आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देण्यासाठी सक्षम करणे म्हणजे सामाजिक कलंक दूर करणे ज्यामुळे बहिष्कार आणि भेदभाव किंवा हानिकारक प्रथा निर्माण होतात. शिवाय महिलांविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलनाचा करार आणि बालहक्कावरील अधिवेशनासह आंतरराष्ट्रीय कायद्यात नमूद केल्याप्रमाणे विधवांच्या हक्कांची खात्री करण्यासाठी सरकारांनी त्यांच्या वचनबद्धतेचे पालन केले पाहिजे. विधवांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राष्ट्रीय कायदे अस्तित्वात असतानाही, अनेक राज्यांच्या न्यायिक व्यवस्थेतील कमकुवतपणामुळे विधवांच्या हक्कांचे व्यवहारात संरक्षण कसे केले जाते आणि त्याकडे लक्ष दिले पाहिजे. न्यायिक अधिकाऱ्यांकडून जागरूकता आणि भेदभावाचा अभाव यामुळे विधवा न्याय व्यवस्थेकडे नुकसान भरपाई मागण्यासाठी वळू शकत नाहीत. शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कृती योजनांच्या संदर्भात विधवा आणि त्यांच्या मुलांवरील हिंसाचार, गरिबी निर्मूलन, शिक्षण आणि सर्व वयोगटातील विधवांना इतर समर्थन यासाठी कार्यक्रम आणि धोरणे देखील हाती घेणे आवश्यक आहे. संघर्षानंतरच्या परिस्थितीत विधवांना शांतता निमर्ण आणि सलोखा प्रक्रियांमध्ये पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आणले पाहिजे जेणेकरून ते शाश्वत शांतता आणि सुरक्षिततेसाठी योगदान देतील आणि कोविड–१९ च्या संदर्भात विधवांना पुन्हा चांगले सक्षम बनवण्यासाठी आमच्या कामातून सोडले जाऊ नये. आमची पुनर्प्राप्ती त्यांच्या अनन्य गरजांना प्राधान्य देते आणि समाजांना अधिक समावेशक, लवचिक आणि सर्वांसाठी समान होण्यासाठी समर्थन देते, याची खात्री करूया. !! जागतिक विधवा दिनानिमित्त समस्त विधवा भगिनींना हार्दिक शुभकामना जी !!

# पावसाळ्याची पूर्वतयारी : सार्वजनिक बांधकाम विभाग सज्ज

मुंबई पावसाळ्यात रस्ते व पूल सुस्थितीत राहावेत, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने व्यापक उपाययोजना राबविल्या असून, राज्यातील प्रमुख रस्त्यांचे व पुलांचे दुरुस्ती व देखभाल काम वेगाने सुरू आहे.

राज्यातील प्रमुख राज्य मार्ग, राज्य मार्ग तसेच प्रमुख जिल्हा मार्ग यांची दैनंदिन देखभाल व वेळोवेळी दुरुस्ती करून हे रस्ते वाहतुकीसाठी योग्य राहावेत, यासाठी विभाग सतर्क आहे. अतिवृष्टीमुळे पाण्याखाली जाणाऱ्या पुलांवर खबरदारीचा उपाय म्हणून सावधानतेचे फलक लावण्यात येत असून, दुरुस्ती किंवा नवीन बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणी वाहतुकीसाठीचे पर्यायी मार्ग योग्य स्थितीत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यात विशेष खबरदारी घेण्यासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली सध्या एकूण १६,५१९ लहान–मोठे व ब्रिटीशकालीन पूल आहेत. यापैकी ४५१ पुलांचे संरचनात्मक परीक्षण करण्यात आले आहे. मागील १० वर्षांत १,६९३ पुलांची दुरुस्ती करण्यात आली आहे.

धोकादायक स्थितीत असलेल्या किंवा वाहतुकीसाठी बंद असलेल्या पुलांच्या दोन्ही बाजूंना सावधानतेचे फलक व बॅरिकेट्स लावण्यात आले आहेत. अशा रस्ते व पुलांची स्थिती शासन स्तरावरून सातत्याने तपासली जात आहे. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या अडचणींवर वेळीच उपाय करता यावा, यासाठी एक प्रमाणित कार्यपद्धती (डजझ) तयार करण्यात आली असून, त्याअंतर्गत अभियांत्रिकी सहायक, कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता व अधीक्षक अभियंता यांना विशिष्ट जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुका स्तरापर्यंत नियंत्रण कक्ष कार्यरत असून, मुख्य अभियंता, अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता हे या कक्षांचे वेळोवेळी निरीक्षण करत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या तयारीमुळे पावसाळ्यातील आपत्कालीन स्थितींना सक्षमपणे तोंड देणे शक्य होणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# मुकुंदवाडी शेतकऱ्यांचा विमानतळ विस्तारीकरण जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी सिडकोकडे मागणी

## कार्यवाही न झाल्यास शेतकऱ्यांनी दिला आत्मदहनाचा इशारा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी संपादित करण्यात आलेल्या सिडको आरक्षित मुर्तीजापूर शेतकऱ्यांच्या जमिनीच्या १२.५० टक्के विकसित भूखंड विस्थापित शेतमालकांना मिळण्यासाठी मुकुंदवाडी गावातील शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला असून याबाबत सिडको प्रशासकांना आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

सिडको प्रशासकांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मुर्तीजापूर येथील सन १९७२ पासून सिडको ने आरक्षित केलेल्या शेतजमिनीचा मोबदला देण्यास सिडको चालढकल करत आहेत. शेतकऱ्यांनी वारंवार निवेदने देऊन मागणी करूनही सिडकोतील अधिकारी सदरील निर्णयास टाळाटाळ करत आहेत.

विमानतळ विस्थापित शेतकरी संघटनेने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना यासंदर्भात दिलेल्या निवेदनानुसार



मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी याच बरोबर खंडपीठाने केलेले आदेश पारित करण्यात यावेत, सदरील प्रकरणात शासनातर्फे वर्णावर आदेश देवूनही नगर विकास सचिव तसेच सिडकोचे अधिकारी यांनी मुख्यमंत्र्यांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न केल्याने या शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. सिडको प्रशासनाने अद्यापही कोणताही सकारात्मक निर्णय घेतला नसल्याने मुकुंदवाडी गावातील शेतकरी संतप्त झाले आहे. शेतकऱ्यावर अन्याय होत असल्याने छत्रपती संभाजी नगर विमानतळाच्या विस्तारीकारणासाठी संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीच्या १२०.५० टक्के विकसित भूखंड विस्थापित शेतमालकांना देण्यात यावी अशी मागणी या निवेदनाद्वारे उत्तमराव खोतकर, साळूजी ठुबे, आत्माराम ठुबे, गंगाधर गायकवाड, देविदास जगताप, बंडू ठुबे, गणेश खोतकर, शेषराव ठुब, प्रकाश साळवे यांनी केली आहे.

# आचार्य डॉ. प्रणामसागर महाराज याचा सानिध्यात जटवाडा येथे होणार पंचामृत अभिषेक महाप्रसाद

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे २४ जून रोजी आचार्य डॉ प्रणाम सागर महाराज याचे सकाळी आगमन




होणार असून त्याचा सानिध्यात सकाळी अभिषेक पूजा प्रवचन आहार चर्या आरती होणार आहे.

तसेच दिनांक २५ जून बुधवारी २०२५ रोजी अमावस्या निमित्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री. संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक आचार्य प्रणामसागर महाराज याचा सानिध्यात व णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी ११ते २ या वेळेस सौ. इंदुमती विजय पापडीवाल सौ. प्रिती विशाल पापडीवाल सौ. मनोरमा राजकुमार पापडीवाल पियुष आनद तरंग प्रासुक अर्घ पापडीवाल परीवार माळीवाडगाव वाला बालाजीनगर छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.

अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा,असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे. श्री.क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते.

# देवगिरी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

दि. २१ जून २०२५ म. शि. प्र मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन शिबिराचे आयोजन २१ जून २०२५ रोजी सकाळी ६:३० ते ८:०० या वेळेत करण्यात आले होते.

यात्प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म हाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. अशोक तेजनकर यांनी योगाभ्यास , नियमित व्यायाम, तणाव मुक्त जीवनशैली, सुदृढ आरोग्य, सुदृढ युवक यासंबंधी मार्गदर्शन केले. या योग शिबिरामध्ये योगशिक्षिका प्रा. बकुळ पाटील यांनी शिबिरार्थीकडून योगाभ्यास करून घेतला. या योगा प्रात्यक्षिक अभ्यासामध्ये ताडासन, पवन मुक्त आसन, भुजंगासन तसेच बैठक स्थितीतील, वज्रासन, त्रिकोणासन, शशांक आसन आणि कपालभाती प्राणायाम, नाडी शोधन प्राणायाम, ध्यान प्राणायाम आदी प्रात्यक्षिक शिबिरार्थी कडून करून घेतले.

यात्प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीसुद्धा योग प्रात्यक्षिकांचे सादरीकरण केले. या योग शिबिर साठी उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ, गणेश मोहिते,, प्रा सुरेश लिपाने , प्रा.अरुण काटे आदि सह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ मन्साराम औताडे यांनी केले तर आभार डॉ. शेखर शिरसाठ यांनी मानले.

# सुंदरादेवी अपंग शिक्षण व प्रशिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलीत स्व. तातेराव पाटील निवासी मतिमंद विद्यालय मोराणे ता. जि. धुळे येथील शाळेस उत्साहात प्रारंभ



**धुळे (अट्टल मत प्रतिनिधी)**

१६/६/ २०२५ वार सोमवार रोजी आपल्या सुंदरादेवी अपंग शिक्षण व प्रशिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजीनगर संचलीत स्व. तातेराव पाटील निवासी मतिमंद विद्यालय मोराणे ता. जि. धुळे येथे शाळा प्रारंभ व प्रवेशोत्सवानिमित्ताने नवगत विद्यार्थी व मागील प्रवेशीत विद्यार्थी यांचे संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव साळुंके पाटील साहेब व मोराणे धुळे महानगरपालिका येथील नगरसेवक मा.श्री. आबासाहेब रावसाहेब नांद्रे यांच्या हस्ते मुलांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत व सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम वरिल मान्यवरांच्या उपस्थितीत शाळा प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न करण्यात आला. तसेच उपस्थित पालकांचाही पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेचे व गणरायाच्या प्रतिमा पुजन करून करून सुरुवात करण्यात आली. तसेच संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. रावसाहेब नांद्रे साहेब यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. शिवाजीराव साळुंके पाटील साहेब यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास उपस्थित संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. शिवाजीराव साळुंके पाटील साहेब यांचा सत्कार शाळेच्या वतीने शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मंदा इंगळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला.

तसेच मंचावर उपस्थित संस्थेचे उपाध्यक्ष सौ. रुपालीताई साळुंके पाटील यांचा सत्कार शाळेच्या मुख्याद्यापिका श्रीमती मंदा इंगळे मॅडम यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला. संस्थेचे सदस्य मा. श्री. शुभम दादा साळुंके पाटील यांचा सत्कार शाळेचे वि. शिक्षक श्री. किशोर पाटील सर यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला.

तसेच शाळेत रुजु झालेले वि. शिक्षक श्री. गजेंद्र कानडे सर यांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. शिवाजीराव साळुंके पाटील साहेब यांनी पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले.

सदर कार्यक्रमात अध्यक्ष साहेबांनी नविन सुरू होणाऱ्या शैक्षणीक वर्षाच्या सर्व कमचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या व सर्व शाळा विभाग व वसतीगृह विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आपापल्या कामाच्या बाबतीत सुचना दिल्या. वरिल कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शाळेचे सायकोलॉजिस्ट श्री. रमेश पाटील सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी सपन्न झाला.

# आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात, आमदार प्रशांत बंब यांनी पर्यटक व शेकडो कार्यकर्तासह जगप्रसिद्ध वेरूळ लेणी परिसरात केली योगासनं

## राष्ट्रीय योग दिनानिमित्त जगप्रसिद्ध वेरूळ लेणी परिसरात योग साधनेचा अनोखा अनुभव

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ लेणी समोर आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शनिवारी वेरूळ लेणी परिसरात योग दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचीन वारसा लाभलेल्या लेणींच्या सान्निध्यात योगसाधना करत नागरिकांनी आरोग्य व शारीरिक तंदुरुस्तीसाठी सकारात्मक पाऊल टाकले.या कार्यक्रमास आमदार प्रशांत बंब यांची प्रमुख उपस्थितीत योगा दिना साजरी करण्यात आले. यावेळी तहसीलदार स्वरूप कंकाळ, तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, शहराध्यक्ष परसराम बारगळ, पंचायत समिती माजी उपसभापती दिनेश अंभोरे, आशिष



कुलकर्णी, विजय राठोड राठोड, सुखदेव ठेंगडे, काकासाहेब नागे, सागर मातकर यांचे सह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूर्यप्रकाशाच्या साक्षीने सुरु झालेल्या या योगा दिन कार्यक्रमात विविध योगासने, वाघाच्या फोटो देण्यात आले.

यावेळी पुरातत्व विभागाचे राजेश वाकलेकर तहसीलदार स्वरूप कंकाळ यांचे सह आधी उपस्थित होते यात्प्रसंगी म न्यवरांनी योगाचे महत्त्व सांगत नागरिकांना दररोजच्या जीवनात योगाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. योगा सारख्या शाश्वत साधनेद्वारे तणावमुक्त जीवन व सशक्त शरीर साकारता येते, असा विश्वास यावेळी सर्वांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक प्रशासन,स्वयंसेवी संस्था व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# बोटॅनिकल गार्डनमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे खासदार, डॉ. भागवत कराड, मंत्री अतुल सावे व उद्योजक, विवेक देशपांडे यांच्या हस्ते उद्घाटन

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालया अंतर्गत येणा-या केंद्रीय संचार ब्यूरो, जिल्हा प्रशासन, छत्रपती संभाजीनगर व भारतीय योग संस्थान (दिल्ली), विभाग-छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २१ जून रोजी बोटॅनिकल गार्डन, एन ८, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार, डॉ. भागवत कराड, महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विभाग मंत्री, अतुल सावे, उद्योजक, विवेक देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आले तर या प्रसंगी भारतीय योग संस्थेचे उपप्रांत प्रधान, डॉ. उत्तम कळवणे, विभागीय प्रधान, संजय औरंगाबादकर, गट प्रमुख- सुरेश शेळके, जिल्हा प्रधान- कैलास जाधव, भाऊ सुरडकर, भास्कर चाटे, सुरेश डहाके, शंकर जाधव, केंद्रीय संचार ब्यूरोचे प्रबंधक संतोष देशमुख आदी उपस्थित होते.



यावेळी योग मार्गदर्शन, योग प्रात्यक्षिक, योग प्रश्नमंजुषा, सांस्कृतिक कार्यक्रम आदीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात डॉ भागवत कराड, अतुल सावे, विवेक देशपांडे व डॉ उत्तम कळवणे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्या कोकणे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संतोष देशमुख यांनी केले. यावेळी सर्वांनी एकत्र योग अभ्यास केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला केंद्र शासनाचे पंजीकृत, लोक जागृती बहुउद्देशीय सांस्कृतिक कला सेवाभावी संस्था (शाहीर सुमित धुमाळ व संच), छत्रपती संभाजीनगर यांच्या योग शाहिरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मोठ्या संख्येने योग साधक उपस्थित होते. कार्यक्रमात केंद्रीय संचार ब्युरो तर्फे प्रश्नमंजुषाचे आयोजन करण्यात आले होते. कैलास जाधव यांनी प्रश्न विचारून विजेत्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्विते करिता प्रशांत नांदेडकर, केंद्रीय संचार ब्यूरो, छत्रपती संभाजीनगरचे प्रदीप पवार, प्रिती पवार व भारतीय योग संस्थान, विभाग छत्रपती संभाजीनगरचे अधिकारी, पदाधिकारी व साधक यांनी विशेष परिश्रम घेतले.

### परिसरातील शेतजमीन, पाणी व हवा प्रदुषित करून हजारो लोकांच्या जिवीताला धोका

# नारेगांव-मांडकी कचरा डेपोतील कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावता बेकायदेशीरपणे डंम्प केल्याप्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करा

### अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटन भारत संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांची मागणी



**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक अधिकारी श्री मनीष होळकर व उपप्रादेशिक अधिकारी श्री ए. एस. नांदवटे यांना निवेदन देताना अ.भा.बळीराजा संघटना संस्थापक अध्यक्ष निवृत्त डक पाटील, अनिता पाटील, प्रभाकर भुसारे, लक्ष्मण टेळे, सुमित्रा गावंडे, आबासाहेब भोसले, विक्रम काकडे, ज्ञानेश्वर काकडे, छाया शेजूळ, योगेश राऊत, बापू लोखंडे, तुकाराम राऊत आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मांडकी शिवारातील गट नंबर ७८,७९ या शासकीय जमीनीवर मनपा छत्रपती संभाजीनगर यांनी मागील सुमारे ४० वर्षांपासून बेकायदेशीर कचरा डंप केलेला आहे. सन २०१८ मध्ये मांडकी सहीत पंचक्रोशीतील शेतकरी नागरीकांनी बेकायदेशीर कचरा डेपो प्रकरणी मोठे जन आंदोलन केले, या आंदोलनाची दखल मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी घेतली व मनपा छत्रपती संभाजीनगर यांना सदरील ठिकाणी कचरा डंप करण्यास प्रतिबंध करुन सहा महिन्यात कचरा उचलण्याचे आदेश दिले.

मनपा छत्रपती संभाजीनगर यांनी मागील वर्षी २०२४ मध्ये नारेगांव-मांडकी येथे ४० वर्षे साठवलेल्या कचऱ्याचे बायोमायनींग करण्याची निविदा काढून सदरील कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने बायोमायनींग करण्याचे कंत्राट मे.जि. एन.आय. या कंपनीला दिले. सदरील ठेकेदार कंपनीने कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने बायोमायनींग न करता शेकडो टन कचरा सोलापूर-धुळे महामार्ग व गांधेली शिवारातील जुन्या खदानीत नेऊन डंप केला. शिवाय मांडकी शिवारातुन वाहणारी सुखना नदी, महाल पिंप्री शिवारातील नदी, कच्चेघाटी, सुलतानपूर शिवारातुन वाहणारे छोटे मोठे नदी नाले व पडीक शेतजमिनीत हजारो टन कचरा डंप केला जात आहे.

मांडकी शिवारातील सुखना नदीत व ओढ्यात विविध ठिकाणी कचरा डंप केलेला आहे. दि. १७ जुन २०२५ रोजी कच्चेघाटी शिवार गट नंबर ३६ सुलतानपूर लागून गट नंबर ९८ व ९३ लागून पडीक शेतजमिनीत ठेकेदाराने जेसीबीच्या सहाय्याने मोठा खड्डा करून नारेगांव-मांडकी कचरा डेपोतुन कचरा आणुन डंप केला जात आहे बेकायदेशीर बायोमायनींग व या कचऱ्यावर प्रक्रिया न करता बेकायदेशीर डंप केल्याने या परिसरातील पाणी, जमीन व हवा प्रदुषित होत असल्याने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी बेकायदेशीर बायोमायनींग व बेकायदेशीर डंपींग याचा स्थळ पंचनामा करुन वरिष्ठांना सादर केला. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर यांनी दि. २१ मार्च २०२५ रोजी नारेगांव-मांडकी कचरा डेपो बेकायदेशीर बायोमायनींग बंदचे आदेश दिले.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे आदेशाला न जुमानता संबंधित ठेकेदार यांनी मनपा आयुक्त व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांच्या आशिर्वादाने व सहकार्याने बेकायदेशीर बायोमायनींग व बेकायदेशीर वाहतूक सुरुच ठेवलेली आहे. सदरील ठेकेदाराने परिसरातील अनेक नद्या, ओढे नाले यामध्ये कचरा डंप करून या भागातील शेतजमीन, हवा व पाणी प्रदुषित करून हजारो नागरीक व लाखो पशुपक्षी यांचे जिव धोक्यात आणले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे विनंती नारेगांव-मांडकी कचरा डेपोतील कचरा विविध ठिकाणच्या नदी, नाले, ओढे व पडीक जमीनीवर डंप करून, परिसरातील शेतजमीन, पाणी व हवा प्रदुषित करून हजारो लोकांच्या जिवीताला धोका पोहचवल्याप्रकरणी संबंधित ठेकेदार, मनपा आयुक्त तथा प्रशासक व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचेवर तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा, व डंप केलेला कचरा तात्काळ उचलून नेण्यात यावा, अन्यथा वरुड, सुलतानपूर, कच्चेघाटी, महालपिंप्री मंडकी गावकरी तिव्र आंदोलन करण्याचा इशारा याद्वारे देण्यात येत आहे, तत्पूर्वी कारवाई करण्यात यावी हि नम्र विनंती, अखिल भारतीय बळीराजा शेतकरी संघटन भारतचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांनी निवेदनाव्दारे कळवले आहे.

# शिवराणा सेवा संघ व नागरी विकास सेवाभावी संस्थेच्या वतीने राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पुंडलिकनगर येथे शिवराणा वाचनालय येथे राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम वेळी एल डी ताटू अध्यक्ष यांनी विचार मांडले त्याग संस्कार ध्येय राष्ट्रभक्ती राष्ट्रप्रेम जुलूम शाही विरोधात छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवून परिवर्तन घडवून आणत शिवशाही अस्तित्वात आनली रयतेचा राजा सुसंस्कृत घडवले. या साठी एल.डी. राजपूत, धरमसिंग राजपूत, गोवर्धन शेवगण, गणेश राजपूत, राहुल राजपुत, अथर्व राजपूत, पवन राजपूत, सौ.शामकोर राजपूत, सौ.चादकोर राजपूत, सौ.सगिता ताटू आदी उपस्थित होते.

# शिवराणा सेवा संघातर्फे ५ जुलै रोजी राज्यस्तरीय गुणवंत सन्मान पुरस्कार व व्याख्यान

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

छत्रपती संभाजीनगर येथील पुंडलिकनगर मेन रोड वर तिरूमला मंगल कार्यालय या ठिकाणी पाच जुलै रोज शनिवारी राज्य स्तरीय गुणवंत सन्मान पुरस्कार शुरविर महाराणा प्रतापसिंह गुणवंत पुरस्कार १५० गुणवंत विद्यार्थी सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन माननिय मंत्री अतुल सावे साहेब यांच्या हस्ते होईल व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान पुरस्कार सुद्धा शुभ हस्ते होणार व प्रमुख पाहुणे आमदार श्रेताताई महाले व माननीय मुख्यमंत्री यांचे सचिव महाले साहेब यांचा विषेश सन्मान करण्यात येणार व त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार तसेच गुणवंत विद्यार्थी साठी व्याख्यान प्रसिद्ध व्यक्ते मा.वसंत हंकारे मोलाचं प्रबोधन होईल.

तसेच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर यांना समाज भूषण पुरस्कार व एमपीएससी यूपीएससी परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानित शुरविर महाराणा प्रतापसिंह पुरस्कार मान्यवर हस्ते करण्यात येणार आहे.

सकाळी दहा ते दोन वाजे पर्यंत कार्यक्रम राहिल संयोजक एल डी ताटू, अँड सुभाष कोकुल्डे, आनंद बारवाल, भाऊसिंग बैनाडे अंजली कोकुल्डे, काळुराम सिंगल, भरत घुनावत, दुर्गासिंग महेर, शाम राजपूत, भोरासिंग राजपूत शाम सिंगल, नारायण मरमट, कैलास जोनवाल, नरेंद्र गिरासे, रूतिक खोकड, गोवर्धन शेवगण, गणेश राजपूत, राजेंद्र परदेशी, अशोक शेवगण,कैलास करघे, नारायण उटाडे, कल्पेश ताटू, प्रविण राजपूत, नारायण महेर, जितेंद्र निकुंभ शिवसिंग खोकड राजू चुगडे, दिलीप घुनावत, भगवान डेडवाल.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199